त्यन्तरलोक महाधिकारत १०३ मध्ये आहेत. यात१७ उपअधिकारा व्दारा त्यंतरदेवांचे निसक्षेत्र, त्यांचे प्रकार, चिन्ह, कुलभेद, नावे, आहार, उन्छ्वास, अवधिज्ञान गंणस्थानादि विकल्पांची माहिती देऊन इतर माहिती भवनवासी देवाप्रमाणेच सांगितली आहे.

## ज्योतिर्लोक-

महाधिकारात ६१९ पधे आहेत. यात ज्योतिषी देवांचे निवासस्थान, त्यांचे प्रकार,संख्या,परिणाम,चर ज्योतिष्कांयांची गति, अचर ज्योतिष्कांयांचे स्वरुप, आयु, आहार, अवधिज्ञान, शक्ति, एकसमयात जीवांची उत्पत्ति व मरण, आयुर्बन्धक भाव इत्यादि सांगून १७ उपअधिकाराव्दारा ज्योतिषी देवांचे विस्तृत विवेचन केले आहे.

सुरलोक महाधिकारात ७०३ पधें आहेत. यात वैमानिक देवांचे निवासक्षेत्र, विन्यास, प्रकार, नाव, सीमा, विमानसंख्या, इंद्रविभूति, आयु, जन्म, मरण, अंतर आहार, उछ्वास, आयुर्बन्धकभाव, देवाचे सवरुप, गुणसथानाहिक, सम्यक्त्वग्रहणाचे कारण, आगमन, अवधिज्ञान, शक्ति व योनि या साधारणपणे २१ उपअधिकाराव्दारे वैमानिक देवांचे विस्ताराने वर्णन केले आहे.

सिध्दलोक महाधिकारात सिध्दांचे क्षेत्र, त्यांची संख्या,अवगाहना आणि सुखाचे वर्णन करुन, ज्या भावनेने सिध्दत्व प्राप्त होते तिचे कथन केले आहे. या प्रकाराच्या पुष्कळ गाथा समयसार, प्रवचनसार आणि पंचास्तिकाय मध्येही दितातत.

त्रिलोक प्रज्ञप्ती ग्रंथातील विषयाशी साम्य धारण करणारे आपणाला कुंद कुंदाचे पंचास्तीकाय, प्रवचनसार समयसार, वट्टकेराचार्यकृत मुलाचार, भगवती आराधना, लोकविभाग, पुन्नाटसंघीय जिनसेन सुरीकृत हरीवंशपुराण, नेमीचंद्र सिध्दांतचक्रवर्ती व्दारा रचीत त्रिलोकसार, पद्मनंदी विरचित जंबूदीवपण्णत्ति, जिनभद्रगणि क्षमाश्रमण लिखित बृहत्खेत्रसमास, श्वेतांबर संप्रदायाचे नेमिचंद्रसूरिनिर्मित प्रवचनसारोद्वार इत्यादि ग्रंथ आढळतात.

आ. यतिवृषभद्वारा रचित 'त्रिलोकप्रज्ञप्ति' ग्रंथ प्राचीनता व प्रामाणिकता याकडे लक्ष वेधून घेणारा आहे. संपूर्ण ग्रंथ प्राकृत भाषेत असून करणानुयोगातला व तीन लोकातील समस्त विषयांचे स्पष्टीकरण करणारा एक अतिशय महत्वपूर्ण ग्रंथ, म्हणून त्याचे वर्णन करावे लागेल. या विशाल रचनेत अनेक रोचक गोष्टीसंबंधीचे परिच्छेद आले असून जैन सिध्दांत आणि साहित्य याचेही वर्णन आले आहे. या ग्रंथात 'करणगाथा' अर्थात् गणितविशयक सूत्रांची माहिती आली असून तिचे सखोल अध्ययन करणे आवश्यक आहे. १८ श्रेणींची गणना व महाराज इ. पदवीनुसार आपणाला प्राचीन भारताच्या राजांचा क्रम तथा त्यांच्या वैभावाविषयी माहिती मिळते. परमाणु, पुद्गल अंगुल यांच्याद्वारे कालमापनाच्या ज्ञानाला सुव्यवस्थितपणा आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

चतुर्थ महाधिकारात शलाकापुरुषांचे अधिक रोचक वर्णन आले आहे. तसेच वर्णन कमी अधिक विस्ताराने आपणाला हरिवंशपुराण, महापुराण, प्राकृत महापुरुषचरित, तिसट्ठि-महापुरिसगुणालंकार, त्रिषष्टिशलाकापुरुषचरित, तामिळ श्रीपुराण इत्यादि ग्रंथातून पाहावयास मिळते. तीर्थकरांच्या चरित्रातून समवसरणरचना, ऋध्दि, चक्रवर्तींची विजययात्रा वगैरे धार्मिक गोष्टींचे विस्तृत विवेचन मिळते.

महावीर स्वामीनंतरची परंपरा जैनधार्मिक साहित्य इतिहासालाच नव्हे तर भारतीय इतिहासाच्या दृष्टीने महत्वाची आहे. कारण त्यातून अनेक राजांचे, राजवंशाचे व त्याचया कालगणनेचे उल्लेख मिळतात. त्रिलोकप्रज्ञप्तीनुसार महावीर निर्वाणापासून शकराजापर्यंतच्या कालाचा विचार केला गेला आहे. पालक, पुष्यमित्र, वसुमित्र, गन्धर्व, नरवाहन, कल्कि इत्यादि राजांचा उल्लेख इतिहासोपयोगी आहेत.

विविध क्षेत्र, तेथील नद्या, पर्वत, मनुष्यांचे वर्णन जैन भूगोल साहित्याच्या पृष्ठभूमीला उचित असून त्याचेही सूक्ष्म अध्ययन करणे आवश्यक आहे. सिध्दांचे वर्णन, आत्मचिंतनाचे उपाय इत्यादि जैन विचारधारेची प्राचीन संपत्ती आहे.

यतिवृषभाचार्यरचित 'तिलोयपण्णत्ति' हा प्राचीन, प्रामाणिक, ऐतिहासिक, भौगोलिक, जयोतिष्कविषयक माहिती देणारा अत्यंत मौलिक ग्रंथ आहे हे अमान्य करता येणार नाही.

## आ. सिध्दसेन दिवाकर

आ. सिध्दसेन दिवाकर एक प्रभावशाली आचार्य होऊन गेले. ते एक महान् तार्किक होते. त्यांना दिगंबर आणि श्वेतांबर दोन्ही संप्रदायात मान्यता मिळालेली होती. आ. सिध्दसेन दिवाकर 'न्यायावतार' कर्ता सिध्दसेन यांच्याहून भिन्न आहेत. यांचा काल साधारणपणे विक्रम संवत ५ वे शतक मानला जातो. यांनी 'सन्मतितर्क' हा प्रसिध्द ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ जैनदर्शन आणि न्यायविषयक एक प्राचीन व महत्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. यात नयवादाचे विवेचन करुन अनेकांत वादाची स्थापना केली आहे. सिध्दसेन दिवाकरांना दिगंबराचार्यांनी महान कवि व प्रभावशाली तार्किक मानून पुष्कळ ठिकाणी त्यांची पद्ये उद्धृत केली आहेत.

भगवज्जिनसेनाचर्यानी आदिपुराणातील प्रथम पर्वात फारच आदराने त्यांचे स्मरण केले आहे.

कवय:सिध्दसेनाधा वयं च कवयो मता: । मणय: पद्मरागाधा ननु काचोऽपि मेचक: ॥३९॥
प्रवादिकरियूथानां केशरी नयकेशर:। सिध्दसेनकविर्जीयाव्दिकल्पनखरांकुर: ॥ ४० ॥

अर्थात् प्रतिवादीरुपी हत्तींच्या समुहामोर हे नयविकल्परुप तीक्ष्ण नख धारण करणारे सिध्दसेन आचार्य सिंहासारखे समजले गेले आहेत. श्वेतांबर संप्रदायात त्यांना 'दिवाकर' हे विशेषण लावले जाते.

याशिवाय आ.सिध्दसेन दिवाकर यांची स्तुति, जिनसेनाचार्य यांनी 'हरिवंशपुराणात', श्रीकल्याणकीर्ति यांनी 'यशोधरचरितात', श्रीहरिभद्रसूरींनी 'पंचवस्तुक' आणि श्रीहेमचंद्राचार्य यांनी 'अयोगव्यवच्छेदिकेत' केली आहे.

पं. जुगलकिशोर मुख्तार यांनी 'जैन साहित्य और दतिहास पर विशद प्रकाश' या ग्रंथातील पृ.नु.५०१ ते ५८५ पर्यत 'सन्मतिसूत्र और विध्दसेन' या लेखात आ. सिध्दसेनाविषयी वरीचशी माहिती दिली आहे.

जैन आचर्य परंपरेत सिध्दसेन नावाचे अनेक आचार्य आणि प्रखर तार्किक विव्दान होऊन गेले आहेत. 'सन्मतितर्क' या महत्वपूर्ण ग्रंथाचे कर्ते सिध्दसेन आहेत हे नक्की आहे, पण हे सिध्दसेन नेमके कोणते, याविषयी काही माहिती मिळू शकत नाही. ते नक्की कोणत्या संप्रदायाचे होते ? त्यांच्या इतर ग्रंथकृति एक वादाचाच विषय होऊन बसला आहे. आणि त्याबाबत अधिकच गोंधळ उडाला आहे. श्वेतांबर,

दिगंबरांनी अनेक ग्रंथ सिध्दसेनाच्या नावावर चढविले आहेत जे उत्तरावर्ती सिध्दसेनांनी लिहिलेले आहेत- १) जीवकल्पचूर्णि, २) तत्वार्थाधिगमटीका, ३) नीतिसारपुराण इ. जे ग्रंथ उपलब्ध नाहीत. उदा-१) व्दित्रिंशद्व्दात्रिंशिका २) सनमतिसूत्र, ३) न्यायावतार, ४) कल्याणमंदिर इ. कल्याणमंदिर ही कृति श्वेतांबरसंप्रदायानुसार सिध्दसेनदिवाकराचीच मानली जाते. परंतु दिगंबर परंपरेनुसार व स्त्रोतातील अंतिम पधात सूचित केल्याप्रमाणे ही कृति कुमुदचंद्राचार्याची मानली जाते. परंतु दिगंबर परंपरेनुसार व स्त्रोतातील अंतिम पधात सूचित केलयाप्रमाणे ही कृति कुमुदचंद्राचार्याची मानली जाते. या बाबतीत श्वेतांबरांचे असे म्हणणे आहे की, सिध्दसेनाचे दीक्षवेळचे नाव कुमुचंद्रार्याची मानली जाते. या बाबतीत श्वेतांबरांचे असे म्हणणे आहे की, सिध्दसेनाचे दीक्षेतेळचे नाव कुमुदचंद्र होते. आचार्यपदाचे वेळी त्यांना त्यांचे पुर्वनाव सिध्दसेन हेच दिले आहे. परुतु श्वेतांबर विव्दान पं. सुखलालजी व बेचरदासजी यांनी ह्या बाबतीत अमान्यता दर्शविली आहे.

पं. सुखलालजींनी व्दात्रिशिका, न्यायावतार आणि सन्मतिसूत्र या एकाच कर्त्याच्या ग्रंथकृती असल्याचे मानले आहे, परंतु तसा पुरावा दिला नाही. यावरुन असे सिध्द होते की, एक 'सन्मतिसूत्र' ग्रंथ सोडून बाकी ज्या सर्व ग्रंथाचा उल्लेख आला आहे त सिध्दसेन दिवाकराचेच आहेत असे निश्चितपणे म्हणता येणार नाही.

## काल

सिध्दसेनाच्या काळाविषयी देखिल विशेष माहिती मिळत नाही. जुगलकिशोर यांनी अंतरपीक्षणाच्या साहाय्याने हा कालनिर्णय ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी सिध्दसेनाच्या साहित्याच्या पाहणीव्दारे बाह्य प्रभाव तथा उल्लेखविशेष, ग्रंथातील विविध वाक्यें व त्याच ग्रंथात उल्लेखित विषयाचा अन्यत्र दिसणारा पडसाद, टीका-प्रटीका,परमतखंडन पध्दति अथवा स्वमतमंडन पध्दति त्या ग्रंथकारांचे सिध्दसेनाविषयीचे त्यांच्या ग्रंथातून काढलेले उद्‌गार इ. बाबीच्या साह्याने कालनिर्णय देण्याविषयींचा फार मोठा प्रयत्न केला आहे'

पं. सुखलालजींनी सन्मतिकार सिध्दसेनाचा काळ वि.सं.५ वे शतक व वि.सं.२ रे शतक मानला आहे. त्यासाठी त्यांनी पूज्यपाद व निर्युक्तिकार भद्रबाहू यांच्या कालाविषयी थोडा विचार केला. परुतु पं.जुगल किशोर यांच्या मते तो उचित नाही. तसेच सन्मतिकार सिध्दसेनाचा काळ वि.संवत दुसरे शतक मानणे तर अगदीच अनुचित असल्याचेही सांगितले आहे.

म्हणून पं.जुगोलकिशोर मुख्तार यांनी आ.विध्दसेन दिवाकराचा काल वि.सं.६ व्या शतकाच्या उत्तरार्धात किंवा ७ व्या शतकाच्या उत्तरार्धातला असावा असे मानले असून, त्याला सबळ पुरावे देखील दिले आहेत. जोपर्यत याशिवाय दुसरा कोणता सबळ पुरावा मिळत नाही तोपर्यत हा काल मानावयास हरकत नाही.

जैन लक्षणातलीत आ.सिध्दसेनाचा काल वि.सं.६ किंता ७ वे शतक मानला आहे. '

भारतीय ज्ञानपीठ प्रकाशनव्दारा प्रकाशित 'जैनेद्र सिध्दांत कोश' मध्ये आ. सिध्दसेन दिवाकराचा काल इ.स.५५० इतका दिला असून, ते श्वेतांबराचार्य होते असे म्हटले आहे. त्यांचे ग्रंथ संस्कृत भाषेत असून ते 'सनमतितर्क' चे कर्ते असल्याचेही म्हटले आहे.

तसे पाहता नयायावतार ग्रंथाचे कर्त सिध्दसेन श्वेतांबर मानले असून, सन्मतिसूत्रकर्ते दिगंबर सिध्दसेन मानले आहेत. परंतु न्यायावतार कर्ता सिध्दसेन याविषयीची दिगंबर संप्रदायात देखील विशेष माहिती मिळत नाही. उलट श्वेतांबर परंपरेतील अनेक न्यायविषयक टीपा-टिपणीमधून त्यांचा उल्लेख मिळू शकतो. अशा प्रकारे श्वेतांबरीय सिध्दसेन व दिगंबरीय सिध्दसेन असे प्रमुख दोन सिध्दसेन मानले असून, ते एकमेकापासून थोड्या फार फरकाने भिन्न तथा अभिन्न देखील मानले आहेत. या दोन्ही सिध्दसंनांचा प्रश्न थोडा वादग्रस्त जरी असला तरी त्यांच्या कृती अथवा ग्रंथरचना अत्यंत उपयोगी व महत्वपूर्ण आहेत. त्यांचे सूक्ष्म अवलोकन करणे आपले आध कर्तव्य ठरते.

## ग्रंथरचना-

आ.सिध्दसेन दिवाकर यांनी विविध प्रकारची ग्रंथरचना केली. त्यातील बऱ्याच ग्रंथात त्यांचे नाव आले असून, ते ग्रंथ मात्र आज उपलब्ध नाहीत. ते एक महान् तार्किक होऊन गेले. त्यांनी कांही व्दात्रिशिकांची रचना केली असून, स्तोत्र केली असल्याचेही दिसून येते.

आ. सिध्दसेनांची 'सन्मतिसूत्र' हीच एक ग्रंथरचना अत्यंत महत्वाची समजी जाते. श्वंतांबर संप्रदायात हा ग्रंथ 'सन्मतितर्क' सम्मतितर्कप्रकरण' व 'सम्मतिप्रकरण' या नावाना ओळखली जातो. हा ग्रंथ म्हणजे जैन वाङ्ययातील एक अमोल ग्रंथरत्न समजला जातो. तो पूर्णतः प्राकृत भाषेत आहे.

दिगंबर परंपरेच्या धवलादि प्राचीन ग्रंथात या ग्रंथाला सन्मतिसूत्र (सम्मइसुत्त) नावाने संबोधिले आहे आणि हे नाव 'सम्मतिप्रकरण' या नावाला अधिक जवळचे आहे. कारण यातील बहुतेक प्रत्येक गाथेत एक सूत्र आहे. अथवा अनेक सुत्रवाक्यासहित आहेत. पं.सुखलाल यांच्या मते देखील संपूर्ण सन्मतिग्रंथ 'सूत्रग्रंथ्स' अयूप प्रत्येक गाथेला सूत्र म्हटले आहे.

'सनमतिसुत्र' ग्रंथाची गणना जैनपरंपरेतील प्रभावी दर्शनग्रंथात केली जाते. श्वेतांबर संप्रदायातील जीतकल्पचर्णि, श्रीचन्दसूरिरचित 'विषमपदव्याख्या' टीका, श्रीअलंकदेवकृत 'सिध्दिविनिश्चय' इ. महत्वाच्या दर्शनग्रंथात 'सनमतिसूत्र' ग्रंथाचा उल्लेख केला जातो. 'सन्मतिसूत्रा' सारख्या शास्त्रांचे अध्ययन करण्यामुळे साधूचे असलेले दोष धुतून जातात. त्याला प्रायश्चित्ताची गरज नसते असे म्हटल्याचे दिसून येते.

'सन्मतितर्क' ग्रंथ तीन कांडानी युक्त असून त्यात अनुक्रमे ५४+४३+७०=१६७ इतक्या गाथा आहेत. ग्रंथाच्या विभाजनालाच कांड असे म्हटले आहे. प्रथम कांडाला काही हस्तलिखित प्रतीत व मुद्रितप्रतीत 'नयकाण्ड' असे म्हटले आहे. कारण हा सारा कांड नयाविषयीच सांगितलेला आहे. त्यात द्रव्यार्थिक तथा पर्यायार्थिक या दोन नयांना मूलाधार मानून इतर नय या नयांचे प्रकार असल्याचे सांगितले आहेत. या कांडात नयांचे सुंदर निरुपण केले आहे. दुसऱ्या कांडाला जीवकांड असे म्हटले आहे. पं. बेचरदासजी यांच्या मते हे नामाभिधान योग्य नाही. त्यांच्या मते या कांडाला ज्ञानकांड अथवा ज्ञेयकांड असे नाव उचित आहे. कारण या कांडात त्यांच्या मतानुसार जीवतत्वाची चर्चा नसून पूर्णतः ज्ञानचर्चा आहे. या कांडाला ज्ञानकांड अथवा ज्ञेयकांड असे नाव उचित आहे. कारण या कांडात त्यांच्या मतानुसार जीवतत्वाची चर्चा या कांडात केली आहे भिन्न असितत्व नाही आणि म्हणूनच याला जीवद्रव्याची याला जीवद्रव्याची चर्चा असे त्यांनी म्हटले आहे. परंतु पं.जुगलकिशोर मुख्तार यांच्या मते ग्रंथाच्या शेतटी येणाऱ्या विषयचये्रवरुन देखील त्या ग्रंथाला तेच नाव देण्याची परंपरा दिसून येते. अर्थात ग्रंथाच्या शेवटी जीवद्रव्याची चर्चा आली आहे. म्हणून कांडाला जीवकांड हे नाव अनुचित नाही असे त्यांचे मत आहे.

तिसऱ्या कांडाला काही नाव दिलेले आढळून येत नाही. डॉ.पी.एल.वैध यांनी या कांडाला 'अनेकांतवादकांड' असे नाव दिले आहे. या कांडातील अंतिम विषयविवेचनवरुन हे नाव योग्य आहे. हा कांड अनेकांत दृष्टिने युक्त असून सामान्य व विशेष प्रकारे विवेचन केले आहे. म्हणून या कांडाचे दुसरे नाव सामान्य 'विशेष कांड' अथवा 'द्रव्यपययिकांड' असेही ठेवता येईल. पं.सुखलालजींनी या कांडाला 'ज्ञेयकांड' म्हटले आहे. या ग्रंथाची गाथा संख्या १६७ असली तरी बेचरदासजी ती१६६ इतकी मानतात. कारण तिसऱ्या कांडातील शेवटची गाथ प्रक्षिप्त गाथा वाटते.

'सन्मतिसूत्र' ग्रथात अगदी सुरुवातीलाच द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक या दोन नयांचे विवेचन आले आहे. त्यामुळे नयवादावर चांगलाच प्रकाश पडला आहे. नयाविषयी थोडी फार माहिती खालीप्रमाणे दिसत-

प्रथम कांडांत दोन्ही नयांना सामान्य विशेष विषयांना विश्रित दाखतून त्यांच्या मिश्रत्वाच्या चर्चेचा शेवट करताना म्हटले आहे-

दव्वटिठओ त्ति तम्हा णत्थि णओ नियमसुध्दजाईओ।
ण य पज्जवठिटओ णाम कोइ भयणाय उ विसेसो॥९॥

अथति द्रव्यार्थिक नयात द्रव्य मुख्य व सामान्य असते आणि पर्यायविशेष गौण असतो आणि पर्यायार्थिक नयात विशेष मुख्य तथा सामान्य गौण असते. त्यानंतर पर्यायार्थिकनयाच्या दृष्टीने द्रव्यार्थिक नयाचे वक्तव्य नियमाने अयोग्य आहे आणि त्याचप्रमाणे द्रव्यार्थिकनयाच्या दृष्टीने पर्यायार्थिक नयाचे वक्तव्य (विशेष) अयोग्य आहे. पर्यायार्थिक नयाच्या दृष्टीने सर्व पदार्थ नियमाने उत्पन्न होतात आणि नाश पावतात. प्रव्यार्थिक नयाच्या दृष्टीने पदार्थ उत्पन्नही होत नाही अथवा नाशही पावत नाही. द्रव्य पर्यायाशिवाय आणि पर्याय द्रव्या (ध्रौव्य) शिवाय असू शक्त नाही. उत्पाद, व्यय, ध्रौव्य ही तिन्ही सतद्रव्याची लक्षणे आहेत. कुंदकुंदाचार्यानी म्हटलेच आहे-

पज्जयविजुदं दव्वं दव्वविजुता य पज्जवा णत्थि । दोण्हं अणण्णभूदं भावं समणा परुवित (पंचस्तिकाय)॥

या विवेचनानंतर दुसऱ्या विभागात द्रव्यार्थिक नय व पर्यायार्थिक नय हे दोन्ही एकमेकांना कसे पूरक आहेत हे दाखवून दिले आहे. अर्थात् दोन्ही नयातील कोणताही एक नय जेव्हा दुसऱ्या नयाची अपेक्षा न करता आपल्या विषयाला सतरुप प्रतिपादनाचाच आग्रह धरतो त्यावेळी तो मिथ्यानय ठरतो. या प्रकारचे वर्णन सन्मतिसूत्रात आ. सिध्दसेन दिवाकर यांनी देखिल मूलनयाप्रमाणेच दुर्णय तथा सुनय म्हटले आहे आणि कोणत्याही एका नयाचा आधार घेतल्याने संसार,सुख,दु:ख,बंध अथवा मोक्ष यांचे यथार्थ निरुपण करता येणार नाही हे स्पष्ट केले आहे. सर्व नयांच्या मिथ्या अथवा सम्यक् स्वरुपाला स्पष्ट करताना ते म्हणतात.

तम्हा सव्वे वि णया मिच्छादिठ्ठी सपक्खपडिबध्दा ।

अण्णेण्णणिस्सिआ उण हवंति सम्मत्तसब्भावा ॥ २१ ॥

म्हणून मूल नय असो अथवा त्यानंतरचे नय (गुणर्थिक) असोत जे एकमात्र आपल्याच पक्षाला स्पष्ट करु इच्छितात ते मिथ्यादृष्टि आहेत परंतु जे नय परस्परांच्या साह्याने वस्तूंचे निरुपण करतात ते नय सम्यक्दृष्टि आहेत.

तिसऱ्या कांडात नयवादाची चर्चा एका वेगळ्याच प्रकारे करुन नयवादाचे परिशुध्द परिशुध्द आणि अपरिशुध्द असे भेद सांगितले आहेत. याच कांडात आ. सिध्दसेनांनी गुणर्थिकनयाची कल्पना स्वतःच करुन त्याचे निरसन देखील केले आहे. या नयवादांच्या स्वरुपनिर्देशनानंतर त्यांनी सांगितले आहे की, जितक्या वचनपध्दति आहेत तितक्या नयवादपध्दति आहेत. व जितके नयवाद आहेत तितकीच जैनेतरनयपध्दति आहे. या कथनानंतर आ. सिध्दसेनांनी जैनेतरदर्शनातील नयपध्दति सांगितली आहे. कपिलाच्या सांख्य दर्शनात द्रव्यार्थिक नयाला मानले आहे. बुध्ददर्शनात परिशुध्द पर्यायनयाला महत्व दिले आहे. कणादाने आपल्या वैशेषिकदर्शनात दोन्ही नयांना मान्यता दिली आहे. याविषयीची व्यवस्थित माहिती गाथा नं. ४६ ते ४९ मध्ये दिली आहे. अर्थात वरील दर्शनात सांगितलेल्या नयात एकांतीपणा आहे. स्याव्दाद-अस्याव्दाद या दोन्ही दृष्टिंने हे सर्व एकत्र आले तर ते अनेकांतात समाविष्ट होऊन जातील व सर्वोत्तम सम्यग्दर्शनाची प्राप्ति होईल.

आ. सिध्दसेनांनी परपक्ष मतांची व्यवस्थित मांडणी करुन पुनः त्यांचे खंडन केले आहे आणि जैनदर्शनानुसार वापरली गेलेली नयपध्दतीच योग्य आहे असे पुनःपुनः आवर्जुन सांगितले आहे. कारण जैनदर्शनात स्याव्दादन्यायाव्दारे समन्वयाची दृष्टि समोर ठेवून ' समन्वय ' हेच मुख्य तत्व मानले आहे. कारण मानले आहे. म्हणून मिथ्यावादर्शने विरोध विसरुन जैनदर्शनात समाविष्ट होतात. सर्वांना एकत्रित करण्याचे हे महान् कार्य अनेकांतवादामुळेच केले जाते म्हणून त्याचा महिमा फार मोठा आहे. अमृतचंदसूरी व समंतभद्र यांनी देखील याच मताला पाठिंबा दिला आहे.

ग्रंथाच्या शेवटी आ. सिध्दसेन दिवाकरांनी जिनशासनाचे तथा पध्दतीचे स्मरण केले आहे. 'सन्मतिसूत्र' ग्रंथात नयविषयक गोष्टीचे प्रतिपादन त्यांनी प्रभावीपणे केले आहे, म्हणूनच इतर प्रभावी दार्शनिक ग्रंथात याची गणना केली जाते. जैनदर्शनाचा अभ्यास करणाऱ्यांना तो अत्यंत उपयोगी तर

आहेच, पण जैनेतर दर्शनातील वाचकांना देखील दोन्हीतील भेद समजण्यासाठी अत्यंत उपयोगी असा हा ग्रंथ असून पठन, मनन करण्यासही सुंदर आहे.

## आचार्य भट्टाकलंक

आ, भट्टाकलंक यांचे स्थान जैनवाड्मयांत अनुपमेय असे आहे. त्यांनी जैन न्यायास चांगले स्वरुप दिले. त प्रकांड पंडित धुरंधर शास्त्रार्थी व उत्कृष्ट विचारक होते. बौध्दांच्या बरोबर त्यांचा खूप संघर्ष झाला. त्यांची सर्व ग्रंथरचना अतिगहन व विव्दान् दार्शनिकांना देखील समजण्यास कठिण अशी आहे. परंतु जैनन्यायास यथायस्थित स्वरुप देणारे आ. अकलंकासारखे विव्दान क्वचितच पाहावयास मिळतील. त्यांनी जैन न्यायास जें स्वरुप दिले त्यावरच, पुढच्या जैन ग्रंथकारांनी आपली न्यायग्रंथरचना केली. आ. भट्टाकलंक दिगंबरसंप्रदायाचे अनुयायी असून देखील, श्वेतांबर संप्रदायातील विव्दानांची देखिल त्यांना प्रतिपादित केलेल्या मतांचा दोन्ही संप्रदायांनी कसलाही भेदभाव न करता स्पष्ट स्वीकार केला आहे. त्यांना जैन न्यायाचे 'सर्जन' असे म्हटले आहे. त्यांच्या नावावरुनच श्लेषात्मकरीत्या जैनन्यायास 'अकलंकन्याय' असे म्हटले आहे. स्वामी समंतभद्र आणि सिध्दसेनानंरि यानीच जैनवाड्मय समृध्द केले. भारतीय साहित्यरुपी आकाशात चमकणाऱ्या ताऱ्यापैकी हे एक विव्दान असल्याचे समजले जाते आणि म्हणूनच आचार्य भट्टाकलंक यांचे नाव ऐकताच जैन धर्मियांचे मस्तक श्रध्देने नत होते.

आ. भट्टाकलंक यानी आपल्या असामान्य बुध्दीने व प्रकांड पांडित्याच्या आधरें अष्टशती, प्रमाणसंग्रह, न्यायविनिश्चय, लघीयस्त्रयी, ततवार्थराजवार्तिक, सिध्दिविनिश्चयसारख्या महान् ग्रंथाची रचना केली. हे सर्व ग्रंथ समजण्यास अतिकठिण असून, त्यातील भाषाशैली गंभीर व गहन आहे.

भट्टाकलंक हे एक महान् आचार्य जरी होऊन गेले असले तरी, त्यांच्या जीवनगाथेविषयीची माहिती मात्र उपलब्ध नाही. जी माहिती आहे ती नसलयाप्रमाणेच आहे. त्यांच्या अमर साहित्यकृती ह्याच आज त्यांच्या नावाच्या, वयक्तित्वाच्या व महान् पांडित्याच्या साक्षी आहेत. आचार्यानी देखील स्वतःचे जन्मस्थान, पितृकुल,मातृकुल अथवा कार्य याविषयी कोठे माहिती दिली नाही. यावरुन प्रसिध्दिपराड्मुखता तथा विनयशीलता हेच त्यांचे गुण प्रकट होतात.

आ. अकलंकानंतर अकलंक नावाचे अनेक विव्दान होऊन गेले आहेत. उदा-अकलंक त्रैविध (इ.स. १२ वे शतक), अकलंक पंडित (इ.स.११००), अलंकारसंहिता व श्रावकप्रायश्चित्तकर्ता अकलंक भट्टारक (इ.स.१३११), परमागमसारकर्ता अकलंक, विवेकमंजरीकार्ता अकलंक (इ.स.११९२), विधानुवाद मंत्रशास्त्रकर्ता भट्ट अकलंक, विधाविनोदकार्ता अकलंक व अकलींकप्रतिष्ठा पाठरचिता अकलंक इत्यादि. यातील अकलंक ही एकच कोणी तरी व्यक्ति असण्याची देखील शक्यता आहे. परंतु सधस्थितींत ते स्पष्ट करुन दाखविण्यास योग्य पुरावा मिळत नाही. प्रसिध्द आध अकलंक आचार्याना 'देव' या शब्दाने संबोधिले असून, भट्ट कुमारिल, भट्ट प्रभाकर यांच्या नावाप्रमाणेच 'भट्ट' ही अकलंकाची पदवी असावी.

## जन्मभूमि व पितृकुल-

आ. भट्टाकलंक यांच्या जीवनाविषयी आपणाला प्रभाचंद्ररचित कथाकोष, ब्रह्मचारी नेमिदत्तकृत कथाकोष व कानडी भाषेच्या 'राजावली' कथेत माहिती मिळते. प्रभाचंद्रकृत कथाकोष व नेमिदत्ताचा कथाकोष यात कसलाही भेद नाही. कारण नेतिदत्ताने प्रभाचंद्राच्या गधकथाकोशाचाच पधानुवाद केला आहे.

कथाकोशानुसार आ. अकलंक यांची जन्मभुमि मान्यखेट होती. तेथील राजा शुभतुंगाचे मंत्री पुरुषोत्तमाचे ते सुपुत्र होते. परंतु राजवलीकथेनुसार ते कांची येथील जिनदास नावाच्या ब्राह्मणाचे पुत्र होते. अकलंकांच्या तत्वार्थराजवर्तिकात एक श्लोक पाहावयास मिळतो त्यात त्यांना लघुहव्व राजाचा पुत्र असे म्हटले आहे.

जीयाच्चिरमकलक्डब्रम्हा लघुंहव्वनृपतिवरतनयः । अनवरिनिखिल विव्दज्जजननुतविधः प्रशसतजनह्द्यः ॥

प्रस्तुतचा श्लोक स्वत्तः ग्रंथकाराने लिहिलेला वाटत नाही. कारण त्याचा दुसऱ्या कोणत्या ग्रंथात उल्लेख मिळत नाही. तरीसुध्दा कथेच्या अनुरोधाने या श्लोकाला महत्व देणे उचित ठरते.

आ. अकलंक हे दक्षिण भारतातील रहिवासी असावेत यात शंका नाही. कारण 'लघुहव्व' हे नाव चिक्क, नन्न या नावाप्रमाणेच दक्षिण भारतातील असावे हे सिध्द होते. परंतु त्यांना कांचीनिवासी

जिनदास ब्राह्मणाचे पुत्र अथवा पुरुषोत्तम नावाने संबोधिले आहे ते अयोग्य वाटते. परंतु ते राजपुत्र असून त्यांच्या पित्याचे नाव 'लघुहव्व' होते हे योग्य वाटते.

राजावली कथेनुसार कांची नावाचे नगर इतिहास प्रसिध्द आहे. ही द्रविडदेशाची राजधानी होती. प्राचीन काळापासून हे एक विधेचे महान् केंद्र मानले गेले आहे. याला दक्षिण भारताची काशी असे म्हणतात. एके काळी स्वामी समंतभद्रानी येथेच आपली विज्ञानरुपी तुतारी फुंकली होती. पल्लव राजवंशाच्या वेळी येथे बौध्द धर्माचा प्रसार अतिजोरात चालला होता. दिङ्नाग व धर्मकीर्मि हे बौध्दधर्म प्रचारक कांचीच्या आसपासचे रहिवासी असून त्यांनी तेथेच बॉध्द दर्शनाचा अभ्यास केला होता. या सर्व गोष्टींचे अवलोकन करता अकलंकाचे पिता लघुहव्व द्रविड देशातीलच कोणत्या तरी एका तालुक्याचे प्रमुख आसावेत आणि अकलंकांचा जन्म कांची नगराच्या आसपासच झाला असावा. तेथे पल्लव तसेच त्यांच्या धर्मानुयायांची बॉध्दधर्मविषयक चर्चा चालत असे. या वातावरणातच वाढलेल्या आ. अकलंकांच्या बाबतीत इतर सर्व घटना असाव्यात. या गोष्टीचे समर्थन केवळ कथेव्दारेच नाही तर शिलालेख व इतर ग्रंथकारांच्या उल्लेखावरुन देखील होऊ शकते.

## बाल्यकाल आणि शिक्षण-

बौध्दाप्रमाणेच जैनराजांनी ठिकठिकाणी विधेची विधापिठे उभारली असावीत, परंतु इतिहासात त्याचा उल्लेख मिळत नाही. बहुधा जैन आचार्य संसारापासून विरक्त होऊन आसपासच्या जंगलात रहात असावेत व ज्यांना आपल्या संततीला ज्ञान देण्याची इच्छा आहे, ते या जंगलातील साधूंच्याकडे त्यांना सुपूर्त करीत असावेत. आ. अकलंक यांचे धार्मिक शिक्षण अशाच प्रकारे झाले असावे.

कथाकोशामधील कथेनुसार एकदा 'अष्टाहिका' पर्व चालू असताना, अकलंकाचे माता-पिता त्यांना व त्यांच्या धाकट्या निकलंक भावाला घेऊन तेथे गेले. धर्मोपदेश श्रवण केल्यावर माता-पित्यांनी आठ दिवसासाठी ब्रह्मचर्य व्रत धारण केले. पुत्रांना देखील ते काही दिवसासाठी दिले. पुढे हे दोन्ही भाऊ वयाव येताच पित्याने त्यांचा विवाह करण्याचे ठरविले. परंतु त्या दोघांनी विवाह करण्याचे नाकारले व घरचे सर्व कामकाज सोडून देऊन ते विधाभ्यास करु लागले. राइस यांच्या मते ज्यावेळी कांची येथे बौध्दधर्मियांनी जैन धर्म प्रसाराला आळा घाताला होता, त्यावेळी ब्राह्मण जिनदास व पत्नी जिनमति यांच्या पोटी अकलंक व निष्कलंक हे दोन पुत्र जन्मास आले. त्यावेळी

जैनधर्माचे शिक्षण देणारे कोणी नव्हते, त्यामुळे या दोघा भावांनी भगवद्दास नावाच्या बौध्द गुरुजवळ गुप्तरीतीने शिक्षण घेतले असावे.

अकलंकाच्या जन्मस्थानाविषयी व पितृकुलाविषयी निश्चित माहिती मिळत नसली तरी, पित्याबरोबर महान् मुनीजवळ जाणे, ब्रह्मचर्य व्रत स्वकारणे, विवाहास अमान्यता देणे व आजनम ब्रह्मचर्य व्रत पाळून विधाभ्यास करणे इ. गोष्टी या आचार्याच्या बाबतीत सत्य वाटू लागतात. कारण अकलंकासारख्या महान् तार्किक व प्रकांड पंडिताच्या बाबतीत हे अशक्य आहे असे म्हणण्याचे कोणाचे सहसा होणार नाही. कारण महापुरुषाच्या पदी विराजमान होण्यास अशा अद्‌भूत घटना आवश्यक असतात, याची साक्ष इतिहास देखील देत आहे. अर्थात् आ. अकलंक हे एक राजपुत्र असून सुध्दा महान् तार्किक व विधाव्यासंगी होते. त्यांचा विधाभ्यास क्षत्रियोचित शस्त्रवीरतेचा मार्ग सोडून तो ब्राह्मणोचित शास्त्रवीरतेनुसार झाला असावा असे दिसते.

## विधार्थिजीवन व त्यांतील संकटे-

आ. अकलंकाविषयींच्या सांगितल्या जाणऱ्या कथांचे अवलोकन केले तर, अकलंक आपलया निष्कलंक भावाबरोबर राहात असून गुप्तरीत्या बौध्दमठात विधाभ्यास करीत होते व ही गोष्ट बौध्द गुरुला समजताच त्यांना शोधून काढणे, दोघे भाऊ पळून जाणे, अकलंकाच्या जीविताचे सरंक्षण पण निष्कलंकाचा बौध्द सैनिकाव्दारे वध होणे हीच कथा थोड्याफार फरकाने पाहावयास मिळते.

कथाकोश ग्रंथात त्यांची पुढीलप्रमाणे एक कथा सांगितली आहे - 'मान्यखेट' नगरात कोणी बौध्द विव्दान् नाही हे जाणून, त्यांनी बौध्द धर्माचा अभ्यास करण्यासाठी विदेश यात्रा केली. पुढे ते एका बौध्दभिक्षुजवळ अज्ञातस्वरुपात राहून विधाभ्यास करु लागले. एकदा दिङ्नाग एक ग्रंथ शिकवित होते. अनेकांताचे त्यांनी खंडन करण्यासाठी पूर्वपक्षात सप्तभंगीनयाचे स्पष्टीकरण त्यांनी केले. परंतु त्यांना व्यवस्थित समजले नाही. त्यावेळी पाठ बंद करुन ते र्निघून गेले. त्यावेळी अकलंकांनी तो पाठ शुध्द केला. अर्थात् हे जैनविधाभ्यासूशिवाय शक्य नाही, हे त्यांनी ओळखले. त्यांनी एक जैनमुर्ति तयार करुन ती ओलांडण्याविषयी सर्व शिष्यांना आज्ञा दिली. नाही, हे त्यांनी ओळखले. त्यांनी एक जैनमूर्ति तयार करुन ती ओलांडण्याविषयी सर्व शिष्यांना आज्ञा दिली. सर्वानी ती ओलांडली. अकलंकांनी मूर्तीवर एक धागा ठोवून ती मुर्ति ओलांडली. परंतु आचार्याना यात सफलता मिळाली नाही. त्यावेळी त्यांनी सर्व शिष्य झोपले असता सर्व शिष्यांच्याजवळ एकेक सैनिक उभा केला व रात्रीच्या वेळी जमिनीवर अति जोरात भांडी आपटून मोठा आवाज केला. सर्व विधार्थी

जागे झाले. त्यावेळी अकलंक व निष्कलंक  देखील पंचनमस्कार मंत्राचा जप करीत जागृत झाले. सैनिकांनी ते ओळखले. आता आपले जीवंत राहणे शक्य नाही हे पाहुन दोघा बंधूनी तेथून पलायन केले. आपणाला मारावयास घोडेस्वार येताहेत, हें पाहून व निष्कलींकाने अकलंकाचे पांडित्य व विव्दत्ता पाहून हा जिवंत राहिला तर, जैनधमा्रवर महान् उपकार होतील हे जाणून, त्यांना जवळच्याच तळ्यामध्ये बुडी मारण्यास सांगितले. अकलंकाने त्याला मान्यता दिली. पण बौध्द सैनिकांच्याकडून निष्कलंक ठार झाला. नंतर तळ्यातून अकलंक बाहेर पडून पुढील आक्रमण करु लागले.

भगवद्दास यांच्या मठात हे दोन्ही भाऊ एकत्र आले. तत्कालीन गोष्टीविषयी राइस यांनी त्यांच्याविषयी पुढील कथा सांगितली आहे- 'अकलंक हे इतके विव्दान् कसे म्हणून बौध्द गुरुने बुध्दाचा दात त्यांच्या छातीवर ठेवला त्यावेळी ते एकदम 'जिनसिध्द' म्हणत उभे राहिले व गुरुला हे जैन असल्याचे समजले.

दुसऱ्या एका कथेनुसार ' अकलंकाचे गुरु जेव्हा पाठ शिकवित असताना थोडा वेळ बाहेर गेले त्यावेळी अकलंकाने एका हस्तलिखित पुस्तकात 'सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग : ' असे लिहिले. अधिक चौकशी अंती हे जैन असल्याचे समजले व त्या दोघाना ठार करण्याविषयी निश्चय केला. आपणाला मृत्यु आला तरी चालेल पण अकलंक मरता कामा नये म्हणून, त्याला एका धोब्याच्या गाठोड्यात लपविण्यात आले. पुढे ते दीक्षा घेऊन सुधापुर येथे देशीयगणाचे मुख्य आचार्य झाले. '

या विविध कथावरुन आ. अकलंकांच्या जीवनाविषयी काही तरी विशेष घडले आहे, हे निश्चित. परंतु याला ऐतिहासिक गोष्टींचा निश्चित पुरावा मिळू शकत नाही. आ. भट्टाकलंक हे तीक्ष्ण बुध्दीचे असून ज्ञानार्थ ते बौध्द व जैन मठातून भटकत होते हे स्पष्ट होते. अर्थात तत्कालीन बौध्द व जैनपरंपरेत विव्दान् आचार्याची कमतरता असल्याचे दिसून येते.

बौध्द भिक्षू व आ. अकलंक यांच्यात शास्त्रार्थाविषयी बऱ्याच वेळा चर्चा होऊन अकलंकांनी त्यांचा पराजय केलेला दिसतो. श्रवणबेळगोळच्या व विंध्यागिरीच्या शिलालेखातून त्यांची माहिती मिळते. अनेक ग्रंथकारांनी देखिल त्यांचे स्मरण केलेले आढळते. याशिवाय महाकवि वादिराजसूरिनीं (श.स. १४८) पार्श्वनाथचरितामध्ये त्यांचा उल्लेख केला असून पांडवपूराण व हनुमच्चरित या ग्रंथातही आहे. वादिराज या महाकर्तीनी 'तार्किकलोकमस्तकमणि' प्रभाचद्राने

'इतरमतावलम्बीवादिरुपी', लघुसमंतभद्रांनी 'सकलतार्किकचूडामणिमरीचिमेचकितचरणनखचकिरण भगवान् भट्टाकलक्डदेवः ' असे म्हणून त्यांच्या तार्किकतेच्या अगाध बुध्दीविषयी श्रध्दा प्रकट केली आहे. स्याव्दादरत्नाकररचयिता श्वेतांबराचार्य देवसूरीनी त्यांना 'प्रकटिततीर्थान्तरीयकलक्डोऽकलक्डः ' तर पद्मप्रभमलधारिदेवाने त्यांना 'तर्काब्जार्क' (तर्करुपी कमलाला विकसित करणारे सूर्य) असे म्हटले आहे.

या सर्व उल्लेखावरुन आ. अकलंकदेव हे तत्कालीन एक विशिष्ट विव्दान् आणि सभेत परमताचे खंडन करण्यात प्रभावी तार्किक तथा गाढे पंडित होते ही गोष्ट स्पष्ट होते.

## ग्रंथरचाना-

आ. भट्टाकलंक यांची अगाध विव्दत्ता, प्रौढ तार्किकता तथा लेखनशैली इत्यादि विषयांची माहिती करुन घ्यावयाची असेल तर, त्यांच्या साहित्यरुपी गंगोत्रित निमग्न होण्याचा प्रयत्न करण अत्यावश्यक आहे. त्यांचे लीखचन गध असो वा पध, ते सूत्रांच्याप्रमाणे अतिसंक्षिपत असून गहन व अर्थबहुलतेने युक्त आहे. कमी शब्दात जासत सांगणे ही त्यांची विशेषता आहे. स्वतःच्या ग्रंथावर स्वतः भाष्य लिहिले आहे, पण ते इतके कठिण आणि जठिल आहे की, व्याक्ष्याकारांना देखील कधी कधी माघार घ्यावी लागली आहे. आ. भट्टाकलंक यांच्या साहित्यावर टीका लिहिणारे अनंतवीर्य आणि स्याव्दादविधापति विधानंदी हे दोन महान् आचार्य होऊन गेले. अनंतवीर्य यांच्यामुळेच आ. प्रभाचंद्र व वादिराज यांना आपली ग्रंथरचना करणे सुलभ झाल्याचे त्यांनी स्वतः मान्य केले आहे.

आ. अकलंकदेवांची ग्रंथरचना दोन प्रकारची आहेः एक पूर्ववर्ती आचार्याच्या ग्रंथावर लिहिलेले महाभाष्य आणि स्वतंत्र ग्रंथरचना. प्रथम प्रकारच्या रचनेत तत्वार्थराजवार्तिक व अष्टशती हे दोन ग्रंथ येत असून दुसऱ्या प्रकारच्या रचनेत लघीयस्त्रय, न्यायविनिश्चय, सिध्दिविनिश्चय , प्रमाणसंग्रह, स्वरुपसंबोधन, बृहत्त्रय, न्यायचूलिका, अकलंकस्तोत्र, अकलंकप्रायश्चित्त आणि अकलंकप्रतिष्ठापाठ या दहा गंथाचा सामावेश होतो. यातील प्रमुख ग्रंथाच्याविषयी सुंक्षिप्त परिचय खालीलप्रमाणे आहे-

१. तत्वार्थराजवार्तिक- उमास्वातींनी लिहिलेल्या तत्वार्थसूत्रावरील ही टीका आहे. अर्थात् ती दिगंबर पाठानुसार लिहिली आहे. सप्ततत्वांचे विवेचन असल्यामुळे या सूत्रग्रंथाला

'तत्वार्थ' असे म्हटले आहे. महान् व गांभीर्याच्या दृष्टीने या ग्रंथाला 'तत्तार्थराज' या आदरणीय नावाने संबोधिले आहे. तत्वार्थसूत्रावील उपलब्ध आध टीका, पूज्यपादलिख्ति सर्वार्थसिध्दि ही आहे. तत्वार्थसूत्र हा मूलग्रंथ १० अध्यायात विभक्त असून, राजवार्तिका देखील दहा अध्यायात विभागाला आहे. या ग्रंथाची शैली अतिप्रौढ आणि गहन आहे. या ग्रंथात आ. अकलंक दार्शनिक, सैध्दांतिक व महान् व्याकरणकार या तीन रुपात प्रगट झालेले दिसतात. त्यांचे सर्वागीण पांडित्य याच ग्रंथावरुन प्रकट होते. या ग्रंथाची विशेषता म्हणजे, जैन दर्शनाचा प्राण असलेल्या प्राण असलेल्या अनेकांतवादाला या ग्रंथंत अधिक व्यापकरुप दिले आहे. सर्ववादांचे निराकरण या ग्रंथात केले आहे. प्रत्येक सूत्राच्या व्याख्यानशैलीतून दार्शनिक दृष्टीकोण प्रकट होतो. अन्यत्र अनुपलबध असलाऱ्या बऱ्याच गोष्टींचे विवेचन प्रस्तुत ग्रंथात मिळते.प्रथम अध्यायात सांख्य, वैशेषिक आणि बौध्द यांच्या मोक्षांचे विवेचन केले आहे. दुसऱ्या अध्यायाच्या दरम्यान विविध शरीरांचे, तुलनात्मक विवेचन आहे. तिसऱ्या अध्यायात अधोलोक व मध्यलोक यांचे विसतृत वर्णन केले असून चपैथ्या अध्यायाच्या दरम्यान स्वर्ग लोकाचे पूर्ण विवेचन केले आहे. पाचव्या अधयात षट् द्रव्यांचे विवेचन केले असून सहाव्या अध्यायात विविध कर्माचा आस्त्रव व त्यांचा विविध परिणाम सांगितला आहे. नवव्या अध्यायात जैनमुनिआचारकथन केले. असून, दहाव्या अध्यायात मोक्षाचे विवेचन केले आहे. अन्यमतांच्या विवेचनासाठी पतंजलीचेक महाभाष्ण्य, दहाव्या अध्यायात मोक्षाचे विवेचन केले आहे. अन्यमतांच्या विवेचनासवाठी पतंजलीचे महाभाष्य,वैशेषिक सूत्र, न्यायसूत्र वसुबंधुचा अभिधर्मकोश इत्यादि ग्रंथातील उध्दरणें पध्दरणें् उद्घृत केली आहेत. श्वेतांबर विषयक सूत्रापाठाचे ठिकठिकाणी स्पष्टीकरण केले आहे.

२. अष्टशती- स्वामी समंतभद्रांच्या आप्तमीमांसानामक प्रकरणावरील हे भाष्य आहे. यात ८०० श्लोक आहेत. यामुळेच या ग्रंथाला अष्टशक्ती असे म्हटले आहे. स्वामी विधानंदींनी देखील अष्टसहस्त्री ग्रंथात 'अष्टशती' चा उल्लेख केला आहे. विधानंदींनी या ग्रंथाची रचना केली नसती तर, या अष्टशतीतील रहस्य तसेच राहिले असते. गहनता, गंभीरता, संक्षिप्ता व अर्थगांभीर्याच्या दृष्टीने या ग्रंथाची बरेबरी करणारा अन्य कोणता ग्रंथ दार्शनिक क्षेत्रात दिसून येत नाही, असे असून सुध्दा या ग्रंथाची भाषा अत्यंत सुबोध व रुचिपूर्ण आहे. सर्व दर्शने अनेकान्तवाद व एकांतवाद या दोन वादात विभाजित केली जातात. त्यातील जैनदर्शन अनेकांततवादी असून बाकी एकांतवादी मानली आहेत. एकांतवादींची यात टीका केली असून शेवटी प्रमाण, फल, स्याव्दाद

आणि नय यांची चर्चा केली आहे. तसेच मीमांसक, चार्वाक यांच्या बरोबरच बौध्द दर्शनावर टीका केली आहे. दिङ्नाग व धर्मकीर्ति यांच्या विवेचनावरही टीकेची झोड उठलेली आहे. साधारणपणे ९९ व्या कारिकेमध्ये सृष्टिकर्त्या ईश्वरवादावर टीका केली आहे.

लघीयस्त्रय-यात एकूण ७८ कारिका आहेत. हा ग्रंथ प्रत्यक्ष परिच्छेद, विषय परिच्छेद, पराक्ष परिच्छेद, आगम परिच्छेद, नयप्रवेश आणि प्रवचन प्रवेश इत्यादी सहा परिच्छेदात विभागला आहे. यात प्रत्यक्ष, परोक्ष प्रमाण, त्याचे विषय, भेदयुक्त नय, निक्षेप इत्यादीचे विवेचन केले आहे. या ग्रंथावर स्वतःअकलंकदेवरचित विवृत्ति, आ. प्रभाचंद्रव्दारारचित न्यायकुमूदचंद्र व अभयचंद्रसूरिकृत तात्पर्यवृत्ति टीका आहे. या ग्रंथाची रचना अष्टशक्ती ग्रंथाला मिळतीजुळती आहे.

न्यायविनिश्चय-या ग्रंथाला एकूण प्रत्यक्षप्रस्ताव, अनुमानप्रस्ताव व प्रवचनप्रस्ताव ही तीन प्रकरणे आहेत. नावानुसार या ग्रंथात प्रत्यक्ष, अनुमान व प्रवचन प्रमाणांचे विवेचन केले आहे. समस्त कारिकांची संख्या ४८० आहे. प्रथम प्रस्तावत बौध्द विकल्प लक्षण, विज्ञानवाद, नैरात्म्यवाद, परमाणुवाद यावर टीका केली आहे. तसेच सांख्य व नैयायिकांच्या मतांचे प्रत्यक्ष खंडन केले आहे. दुसऱ्या प्रस्तावात साध्य, साधन, हेत्वाभास प्रत्यभिज्ञा तर्क, जाति व वाद दत्यादी गोष्टींचे सुंदर विवेचन केले आहे. जीवस्वरुपाच्या चैतन्याबाबत चार्वाक व वैशेषिक मतांचे खंडन केले आहे. तिसऱ्या प्रस्तावात मोक्ष व सर्वज्ञाचे विवेचन करुन बौध्दांच्या करुणावत्व, सर्वज्ञत्व व चतुरार्यसत्य दत्यादी गोष्टींचा उपहास केला आहे. सप्तभंगीनयाव्दारे सर्व गोष्टींचे विवेचन करुन ग्रंथसमाप्ति करण्यात आली आहे. या ग्रंथाची नचना अष्टशती, प्रमाणसंग्रह या ग्रंथाच्या अगोदर झाली असावी. यसा ग्रंथाची भाषाशैली इतर ग्रंथाशी मिळतीजुळती आहे.

सिाध्दिविनिश्चय या ग्रंथात एकूण १२ प्रस्ताव आहेत. ते पुढील प्रमाणे-प्रत्यक्षसिध्दि, सविकल्पसिध्दि, प्रमाणान्तरसिध्दि, जीवसिध्दि, जल्पसिध्दी, हेतुलक्षणसिध्दि, शास्त्रार्थसिध्दि, सर्वज्ञासिध्दि, शब्दसिध्दि, अर्थनयसिध्दि, शब्दनयसिध्दि व निक्षेपसिध्दि इत्यादि यावर अनंतवीर्यव्दारा रचित टीका आहे. तत्वार्थटीका, न्याककुमुदचंद्र, प्रमाणमीमांसा, स्याव्दादमंजरी इत्यादि ग्रंथात या ग्रंथातील उध्दरणे उद्धृत केली आहेत.

प्रमाणसंग्रह-या ग्रथात प्रत्यक्ष, स्मृति इत्यादि भेदांनी युक्त परोक्ष, अनुमान व त्याचे अवयव, हेतू, हेत्वाभास, वाद,सर्वज्ञता आणि सप्तभंगी इत्यादि विषयांचे स्पष्टीकरण केले आहे. यातील कारिकांची संख्या ८७१/२ इतकी आहे. यावर एक स्वोपज्ञ विवृत्ति असून कारिकांच्या अर्थाला पूरक

आहे. या ग्रंथाची रचना बहुधा न्यायविनिश्चय ग्रंथानंतर झाली असावी. हा ग्रंथ गधपधानी युक्त आहे. या ग्रंथाची भाषा जटिल आहे. प्रमेयप्रमाणांचा संग्रह करणारा या ग्रंथासारखा दुसरा ग्रंथ नसावा. कदाचित् ही अकलंकाची अंतिम रचना असावी. यात एकूण ९ प्रस्ताव आहेत.

बृहत्तत्रय-लघीयस्त्रय ग्रंथाच्या नावापासून या ग्रंथाची उत्पत्ति झाली असावी. हा ग्रंथ सध्या तरी अनुपलब्ध आहे. अकलंकाच्या लघीयस्त्रय ग्रंथाशिवाय सिध्दिविनिश्चय, न्यायविनिश्चय आणि प्रमाणसंग्रह या ग्रंथरचना अधिक महत्वपूर्ण आहेत. या ग्रंथाच्या अस्तित्वाविषयी अजून माहिती उपलब्ध झाली नाही.

अकलक्डस्तोत्र- या स्तोत्रात १२ शार्दूलविक्रीडीत व ४ स्त्रग्धरा छंद आहेत. यात महादेव, शंकर, विष्णु, बुध्द इत्यादी नामधारी देवताविषयी जे कांही सांगितले आहे त्याची टीका करुन निष्कलंक, वीतराग, परमात्मा, बुध्द, वर्धमान, ब्रह्मा, केशव, शिव इत्यादि नावांनी जिनेश्वरांना संबोधले आहे. यातील ११ व१२ पधाच्या अंतिम चरणात नग्नतेचे वैशिष्ट्य विशद केले आहे.

आ. अकलंकांच्या या प्रमुख ग्रंथशिवाय आणखीही काही ग्रंथ असावेत परंतु त्यांची विशेष माहिती मिळत नाही. खरोखर एवढी महान् ग्रंथरचना करणारे आ. अकलंक हे केवढे महान् विव्दान् असावेत याची कल्पनाच करवत नाही.

## काल-

आ. अकलंकांच्या काळविषयी देखील बराच मतभेद आहे. अकलंक मान्यखेट राजा शुभतुंग मत्र्याचे सुपुत्र असल्याचे बहुधा मान्य केले गेले आहे. राष्ट्रकूटवंशी राजांच्यात 'शुभतुंग' ही पदवी मानली जाते. परंतु त्यावंळी राष्ट्रकुटाची राजधानी मान्यखेट ही नवहती. तरीसुध्दा याच आधारावर डॉ.के.बी. पाठक यानी अकलंकाला प्रथम कृष्णराजाच्या समकालीन मानले आहे. डॉ. विधाभूषण यांनी पाठकांच्याच मताचे अनुकरण करुन अकलंकाचा काल इ.स.७५० च्या दरम्यान निश्चित केला आहे. पं. नाथूराम प्रेमी यांनी वरील मतांचाच आधार घेऊन आ. अकलंकांचा काल इ.स. ८१० ते ८३२ इतका मानला आहे. सेवा मंदिरव्दारा प्रकाशित 'जैन लक्षणावली' ग्रंथात अकलंकाचा काल इ.स. ७२० ते ७८० (वि.सं.७७७ ते ८३७) दिला आहे. ' भारतीय ज्ञानपीठ प्रकाशनव्दारा संपादित

'जैनेनद्रसिध्दात्नकोश' मध्ये आ. अकलंकाचा काल इ.स. ६६० ते ६८० इतका दिला आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार करता आ. भट्टाकलंक हे इ.स. ७ ते८ या शतकात होऊन गेले असावेत.

आ. अकलंकांच्या व्यक्तित्वाचे अवलोकन केले तर, जैन-न्याय साहित्यातील ते एक असामान्य विव्दान् होऊन गेले यात कसलीच शंका नाही. ते तर्कप्रधान व विचारप्रधान होते. तसेच स्वतः अल्पभाषी आणि सतत विचार करणारे विव्दान होते. जसजसे ते वयस्कर होत गेले, तसतसे त्यांचे साहित्य विकसित होत गेलेले दिसते. त्यांनी जणू 'गागरमेंट सागर' या उक्तीप्रमाणेच आपली ग्रंथरचना केली आहे. अर्थात थोड्या शब्दात विपुल असे तत्वज्ञान सांगितले आहे. त्यांची ग्रंथरचना चिंतनीय व संशोधनीय आहे. त्यातील एकही शब्द व्यर्थ वापरलेला दिसून येत नाही. ते शुध्द दार्शनिक नव्हते तर मोठे विनोद व उपहासात्मकरित्या लिहिण्यात कुशल विव्दान होते. त्यांच्या साहित्यरुपी वनात विहार करणाऱ्या व्यक्तीला प्रथम अत्यंत कष्टाने थकवा येतो तर, नंतर दार्शनिक उपहासाच्या पुटामुळे त्यांचा थकवा दूर होऊन मेंदूला तजेलपण प्राप्त होतो.

आ.अकलकांनी अशा एका कालात जन्म घेतला की, जेव्हा सगळीकडे बौध्ददर्शनाचा पूर्णतः प्रभाव पडला होता व इतर दार्शनिक पूर्णतः त्यामुळे त्रस्त झाले होते. परंतू अशा वेळी ज्ञानाची तीव्र इच्छा बाळगून त्यांनी जैनधर्माचे वर्चस्व प्रकट केले. बौध्द दर्शनासह सर्व दार्शनिकांच्या मतांचे खंडन करून, स्वमताचे व्यवस्थित प्रतिपादन केले. स्वतःच्या ग्रंथरचनेतून त्यांनी इतर दार्शनिकांना कधी शिवीगाळ केली नाही. उलट उपहासात्मक शब्दांनी आपले विचार प्रकट केले आहेत. त्यांचा याबाबत व्यक्तिगत अथवा दार्शनिक द्वेष नव्हता, तर दर्शनातील सिध्दांताविषयी मतभेद होता. त्यांचा आत्मविश्वास, प्रभवीपणा व वैचारिकता इत्यादि त्यांचे सद्गुण वाखाणण्यासारखे आहे. त्यांच्या असामान्य ग्रंथरचनेवरूनच त्यांचे असामान्य व्यक्तित्व प्रगट होते.

**आचार्य रविषेण**

आचार्य रविषेणांनी पद्मपुराण ग्रंथाची रचना केली. या ग्रंथाला पद्मचरित या नावाने देखील संबोधिले आहे. हा ग्रंथ संस्कृतमधील प्रसिध्द ग्रंथ असून, त्याचा हिन्दी अनुवाद उत्तर भारतातील जैनांच्या

घरोघरी नित्य वाचला जातो. आ. रविषेणांनी या ग्रंथाची रचना भ.महावीर निर्वाणनंतर १२०३ वर्षानी केली. ज्याप्रमाणे विमलसुरींचा पउमचरिउ ग्रंथ प्राकृत जैन कथा साहित्याचा एक प्राचीन ग्रंथ मानला जातो, त्याचप्रमाणे रविषेणांनी लिहिलेला पद्मपुराण संस्कृत जैन साहित्याचा प्राचीन व प्रमुख ग्रंथ समजला जातो.

आ.रविषेण अर्हन्मुनीचे प्रशिष्य असून, लक्ष्मणसेनाचे शिष्य होते. अर्हन्मुनीचे गुरु दिवाकर यति असून गुरू इंद्र होते.

आसीदिन्द्रगुरोर्दिवाकरयतिः शिष्यो स्य चार्हन्मुनिः । तस्माल्लक्ष्मणसेनसन्मुनिरदः शिष्यो रविस्तत्स्मृतः ॥

रविषेणाने आपल्या संघाचा गण गच्छाचा अथवा ठिकाणाचा कसलाच उल्लेख केला नाही. परंतू सेनान्त नावावरून ते बहुतेक सेनसंघाचे असावेत. यांची संपूर्ण गुरुपरंपरा इंद्रसेन, दिवाकरसेन, अर्हत्सेन आणि लक्ष्मणसेन असावी.

उद्द्योतनसूरीने वि.सं.८३५ मध्ये लिहिलेल्या आपल्या कुवलयमाला ग्रंथात विमलसूरीच्या पउमचरिउ व रविषेणाच्या पद्मचरित्राबरोबरच जटिलमुनीच्या वरांगचरिताची स्तुति केली आहे. यावरून असे दिसते की, उद्योतनसूरीला वरील ग्रंथाविषयी माहिती असावी.

पुन्नाटसंघीय जिनसेनाने वि.सं.८४० मध्ये लिहिलेल्या आपल्या हरिवंश पुराणात उद्द्योतनसूरीनंतर ५ वर्षानी तयार झालेल्या रविषेणाच्या पद्मचरित्राची प्रशंसा केली आहे. अपभ्रंश भाषा कवि धवलाने रविषेणाचा उल्लेख करून त्याच्यानंतर जटिलमुनींचा उल्लेख केला आहे. यावरून जटासिंहनंदीचा वरांगचरित ग्रंथ रविषेणाच्या पद्माचरित्रानंतरचा असावा.

जैन लक्षणवलीत (जैन पारिभाषिक शब्द कोश) संपादक बालचंद्र सिध्दांतशास्त्री यांनी रविषेणाने पद्मपुराण ग्रंथाची रचना साधारणपणे वि.सं.७३३ मध्ये केली असल्याचा उल्लेख केला आहे१.

भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन द्वारा संपादित जैनेंद्र सिध्दांत कोशात रविषेणाचा काळ इ.स.६४३ ते ६८३ दिला असून, ते सेनसंघाचे असल्याचाही उल्लेख केला आहे. याच ग्रंथात (पृ.नं.३४७) सेनसंघाविषयीची माहिती दिली आहे. सेनसंघाची स्थापना अर्हद्वलिद्वारा वीरनिर्वाण सं.५९३ मध्ये झाली. सेनसंघाच्या गुर्वावलीत रविषेणाचा काल निश्चित इ.स.६४३ ते ६८३ (वि.सं.७०० ते ७४०) दिला असून इंद्रसेन, दिवाकरसेन, अर्हत्सेन,

लक्ष्मणसेन यांचा काल त्यांच्या कालावरून निश्चित करण्यात आला आहे१. रविषेणांच्या स्थल कालाविषयी यापेक्षा आधिक माहिती मिळत आहे.

**पद्मपुराण : ग्रंथपरिचय -**

आ.रविषेणरचित पद्मपुराण हा एक महान ग्रंथ आहे. तो दिगंबर संस्कृत साहित्यातील एक जुना ग्रंथ मानला जातो, या ग्रंथात प्रभु रामचंद्राच्या जीवनाविषयी विस्तृत विवेचन केले आहे. खरोखर रामाची ही कथा इतकी रोचक आहे की, तिचा बहुतेक सर्व संप्रदायांनी थोड्या फार फरकाने स्वीकार केला आहे. हा ग्रंथ विविध घटना व विषयानुसार १२३ पर्वात विभागला गेला आहे. यातील कथेचे नायक आठवे बलभद्र पद्म (राम) व लक्ष्मण आहेत. सर्वसाधारण लोकांचे हे दोघेही श्रध्दास्थान आहेत.

रामाचा देहवर्ण तरूण सूर्याप्रमाणे होता. त्याचे विशाल वक्ष:स्थल लक्ष्मीने आलिंगिल्याप्रमाणे सुंदर दिसत होते. त्याचे डोळे कमलाप्रमाणे होते. म्हणून दशरथ राजा व अपराजिता (कौसल्या) यांनी त्यांचे नाव पद्म असे ठेवले होते. याच रामाच्या पवित्र चरित्राला रामायण असे म्हणतात. अर्थात रामाच्या जन्मापासून त्याच्या मुक्तिपर्यंतच्या सर्व जीवनविषयक गोष्टींचा खुलासा या ग्रंथात आढळतो.

खरोखर रामायण हे एक आदर्श काव्य आहे. ते अतिलोकप्रिय असून सीताहरण करण्याऱ्या रावणाला देहांताची शिक्षा देऊन, अबला स्त्रीची सुटका करून, मनुष्य जातीला व स्वतःच्या राजघराण्याला रामाने विजय मिळवून दिला. त्यामुळे समाजाच्या सर्व थरातील लोक या रामायणावर अत्यंत श्रध्दा ठेवतात. हे अमान्य करता येणार नाही. आदर्श पिता, आदर्श माता, आदर्श पुत्र, आदर्श सेवक या सर्वापासून समाजाला संस्कृतीचा एक वारसा मिळाला आहे.

रविषेणांनी पद्मपुराणातील रामकथा अहिंसेला धरून लिहिली आहे. त्यातील राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, मारूति ही सर्व पात्रे अहिंसावादी असून जैनधर्माची पुरस्कर्ती असल्याची दाखविली आहेत. यज्ञातील पशुहत्त्या संपुष्टांत आणण्याचे महान कार्य जैनधर्माने केले यात शंका नाही. आ.रविषेण एक माहन प्रतिभाशाली कवि होऊन गेले. त्यांनी मु रामयणाचा आधार घेतला असला तरी, त्यात बराच बदल केला आहे. हा बदल सुकीर्तीच्या साह्याने त्यांनी सात अधिकाराद्वारे दाखविला आहे. पहिल्या पर्वातील जिनेंद्राच्या स्तुतीपासून १२३ व्या पर्वातील बलभद्रांना स्वर्ग व मोक्षप्राप्ति, येथपर्यतचे सर्व थोर पुरूष, त्यांची दैनंदिनी, रावणाचे चरित्र, त्याचा मंदोदरीशी विवाह, परस्त्रीचे सेवन करणार नाही ही प्रतिज्ञा, हनुमान जन्म, हनुमान अनंगपुष्पा विवाह, अनेक चक्रर्वीच्या कथा, व अध्यात्मिक विवेचने या ग्रंथात आली आहेत.

पद्मपुराणाची रचना पूर्णतः जैन धर्माला अनुसरून रविषेणांनी केली आहे. त्यात अहिंसाव्रत, मोक्षप्राप्ति यांना विशेष महत्व असून परिव्राजक, श्रमण, क्षपक, साधु जीवन इत्यादी बाबींचे विवेचन केले आहे. रावणाला विविध विद्यांची प्राप्ति झाली होती व तो एक बलाढ्य, महान ऐश्वर्यशाली, पराक्रमी राजा असलयाचेही सांगितले आहे.

पवनंजयाची पत्नी अंजना व तिची सखी वसंतमाला या दोघी गुहेत राहिल्याचा एक सुंदर प्रसंग दाखविला आहे. तेथेच अंजनेला पूत्र झाला. विमानातून जात असताना तो शिळेवर पडला म्हणूनच त्याचे नाव श्रीशैल व हनुमान असे ठेवले. हा हनुमान म्हणजेच मारुति होय. त्याने अनेक स्त्रियांशी विवाह केला होता.

पद्मपुराणातील राम-लक्ष्मण कथा २१ व्या पर्वात सुरू झाली आहे.  राम हा जैनांचा आठवा बलभद्र व लक्ष्मण हा आठवा नारायण मानला जातो.  दशरथाने अपराजिता, सुमित्रा, सुप्रभा या तीन लावण्यवती राजकन्यांच्याबरोबर विवाह केला होता.  अपराजितेचे सारथ्य दशरथाला आवडले व त्याबद्दल मागेल ते वर देण्याचे वचनही त्याने अपराजितेला (कैकयीला) दिले.

पुढे २७ व्या पर्वात सीता जन्माची कथा आली असून ती तारूण्यात आल्यावर तिचा विवाह रामाबारेबर करण्याचे ठरविले.  राम देखील विविध कालांनी निपुण होऊन तारुण्यात आल्यावर अपाल्या बाहू सामर्थ्याने त्याने बर्बर, म्लेंच्छ यांचा पराभव केला आणि पुढे रामसीतेचा विवाह थाटाने साजरा केला.

३२ व्या पर्वात कैकेयीने दशरथाला राहिलेला वर मागितला.  त्यात भरताला गादीवर बसवून, रामाला वनवासास पाठवावे असे सांगितले. दशरथाला ते मान्य करावे लागले.  राम-सीता-लक्ष्मण वनवासास निघाले. दशरथ राजपुत्र रामाशिवाय दुःखी होऊन राहिला.

रमा,सीता, लक्ष्मण दंडकारण्यात जटायुपक्ष्यासह राहू लागले.  या निवासातच खरदूषण व शम्बूकाला लक्ष्मणाने मारले.  त्याचवेळी रावणाने सिंहनाद केला.  काही तरी अपशकुन आहे,  हे जाणून राम लक्ष्मणाच्या मदतीस धावला.  इकडे कुटीत सीतामाठ एकटीच होती. ही संधी साधून रावणाने सीतेचे हरण केले.  वाटेत जटायुबरोबर त्याला युध्द करावे लागले.  जटायूने आसन्न मरण पत्करले.  रामाने त्याला णमाकार मंत्र सांगितला व जटायु गतप्राण झाला.  लक्ष्मण रामाकडे पोहचताच तो सिंहनाद रामाचा नव्हता हे जाणून व सीता एकटीच राहिल्याचे पाहून रामाला खेद झाला.  परत येऊन पाहतो तर सीता कुटीत नव्हती. राम सीतेच्या विरहाने वेडे होऊन रानावनातून भटकू लागले.

रावणाने सीतेला पळवून नेऊन लंकेतील गीर्वाण - रमण उपवनात ठेवले व तिच्या भोवती कडक पहारा ठेवला.  रामाची वार्ता समजल्याशिवाय अन्नग्रहण करणार नाही अशी सीतेने प्रतिज्ञा केली होती. अनंतवीर्य मनीजवळ केलेल्या प्रतिज्ञानुसार रावण सीतेवर कसलीच जबरदस्ती करू शकत नव्हता.

सीतेची सुटका करण्याची शपथ सुग्रीवाने जिनमंदिरात घेतली. रावण रहात असलेली लंका नगरी एक दिव्य नगरी होती. त्याच नगरीत सीतामाई आक्रोश करीत होती. रामाने मारूतीला तिकडे पाठविण्याचे ठरवून त्याच्याजवळ ओळख म्हणून स्वतःच्या हातातील अंगठी दिली. सीतेजवळ जाऊन मारूतीने रामाचा वृतांत सांगितला आणि परत आपली ओळख रामाला पटावी म्हणून चुडामणी रत्न दिला.

सीतेच्या सुटकेचा जोरदार प्रयत्न सुरू झाला. राम व रावणाचे सैन्य समोरासमोर लढाईस उभे ठाकले. वीर योध्दयांची भाषणे झाली. त्याच वेळी रावणाला अपशकुन होऊ लागले. भालू नावाचे पक्षी आकाशातून विहार करीत असताना रोदन करू लागले. गिधाडांचा समूह पंख पसरून नभात विहार करताना जणुं सगळीकडे अंधार पसरला. पुढे नल, नील, मारूती यांची युध्दे झाली. रामचंद्र -कुंभकर्ण, रावण बिभीषण एकमेकांना भिडले. रावणाने शस्त्राने लक्ष्मणवर प्रहार केला तो निश्चेष्ट होऊन जमिनीवर पडला. तेथे विशल्या नामक एक अद्‌भूत स्त्री आली. तिने लक्ष्मणाच्या अंगाला चंदनाचा लेप लावला तो शुध्दिवर आला व लक्ष्मण - विशल्या विवाह झाला. मंदोदरी युध्द न करण्याबाबात पुनःपुन्हा रावणाची विनवणी करीत असताना त्याने ऐकले नाही व राम-लक्ष्मण यांना ठार मारण्याची त्याने प्रतिज्ञा केली. पण त्या विनवणीचा काही उपयो झाला नाही.

मयाशी मारूतीचे युध्द चालू असताना रावण मया च्या मदतीला धावून आला. लक्ष्मणाने त्याला अडविले रावणाने त्याच्यावर चक्ररत्न फेकले पण लक्ष्मणाने ते झेलले व रावणाच्या अंगावर त्याने तेच चक्र आवेगाने फेकले. रावण तात्काळ गतप्राण होऊन धरणीवर पडला.

मृत रावणाचा देह पाहून मंदादरी, विभीषण, भामंडल व इतर सर्व वीर शोक करू लागले. कारण रावण विद्वान, बलाढ्य, पराक्रमी, व्रतपालन करणारा होता. एक सीता हरणाचे डागाळलेले पृष्ठ सोडले तर रावणाचा संपूर्णग्रंथ चारित्र्यपूर्ण व शुध्द होता. रावण मृत झाला. वैर संपले, इंद्रजित विरक्त झ ाला अनेक लोक मुनि झाले. बाकीचे केवली झाले. मंदोदरी व इतर स्त्रियांना विरक्ति उत्पन्न झाली.

रामाने सीतेचा शोध केला. दोघे एकमेकांना मिळाली. देवांनी त्यांच्यावर पुषवृष्टि केली. त्यांचे राज्यवैभव त्यांना मिळाले. भरताचे मन त्यावेळी विरक्तिकडे वळले. रामने हवे असणारे मथुरेचे राज्य शत्रुघ्नाला दिले. ९५ पर्वात सीतेला चांगली वाईट काही स्वप्ने पडली. तिने जिनंद्रपूजा केली. तिला डोहाळे लागले. परंतु ती गरोदर आहे हे पाहताच लोकांच्या मनात तिच्या चारित्र्याविषयी शंका निर्माण झाली. रामानेही ते मान्य केले व तिला वनात सोडून देण्याची आज्ञा सारथ्याला दिली. सीता सुरनदीच्या किनारी अरण्यात पोहचली. तिला दु:खवेग आवरत नव्हता. तरीसुध्दा ती म्हणाली. हे पतिराज माझ्याकडून काही दोष घडला असेल तर त्याची मला क्षमा करा अथवा प्रायश्चित द्या पण जिनधर्मावर अढळ श्रध्दा ठेवा.

दिवसेंदिवस सीतेचा गर्भ् वाढू लागला. ती प्रसूत झाली. तिला लव, अंकुश दोन पुत्र झाले. त्यांनी राम-लक्ष्मणांशी वयात येताच युध्द करून त्यांना जर्जर केले. नारदाकडून ही मुले आपलीच असल्याचे रामाला समजले. बिभीषणाने रामाला सीतेचा स्वीकार करण्याची विनंती केली, पण सीता अग्निदिव्य करून निर्मळ असल्याचे सिध्द करून दाखवील तर तिचा मी स्वीकार करेन असे रामाने सांगितले.

सीतेने धगधगत्या अग्नीकुंडात उडी टाकली. पण अग्नीचे पाणी झाली. सीता महापतिव्रता असल्याचे सर्वांना समजले व रामाने तिचा स्वीकार केला.

रामाने सीतेचा स्वीकार केला. परंतू सीतेने रामास वैराग्यपर उत्तर दिले व ती विरक्त इ ाली. या ठिकाणी सकलभूषण केवलीचा धर्मोपदेश, नरक दु:ख वर्णन, संसारी जीवाचे भेद-प्रभेद, औदारिकादि देहांचे वर्णन, ज्योतिर्लोक, स्वर्ग, ग्रैवेयक, अनुदिश पंचानुत्तर मुक्तांच्या सुखाचे वर्णन व मोहाने प्राप्त होणाऱ्या अनेकविध गोष्टींचे विवेचन या ठिकाणी केले आहे. ते एंकून श्रीरामचंद्रांना केवलोत्पत्ति झाली. त्यांनी पुढे २५ वर्षे उपदेश केला व मुक्त झाले.

शेवटी आ.रविषेणांनी पुन: जिनांना वंदन करून, आपल्या या महानकथेची समाप्ति केली. या ग्रंथातील ही कथा अति मनोरंजक असून सीताशुध्दि प्रकरण तर आपले मन पूर्णत: वेधून घेते व ही महान कथा घरोघरी ऐकावयास मिळते.

स्वयंभू कवींनी पउमचरिउ मध्ये रविषेणाचार्याविषयी उल्लेख केला आहे. त्याचा मतितार्थ असा -

ही रामकथारूपी नदी भ. महावीरांच्या मुखपर्वतापासून निघाली. या वाहाणाऱ्या नदीला गणधरांनी पाहिले. गौतमगणधरांनी व गुणलंकृत धर्माचार्यानीही ती पाहिली. नंतर प्रभव मुनिराजांनी तिचे अवलोकन केले. पुनः त्या रामकथारूपी नदीला अनुत्रवादी कीर्तिधर व रविषेण या आचार्यानी पाहिले व स्वयंभूदेव कवीनी आपल्या बुध्दिने या रामकथारूपी नदीत अवगाहन केले.

कवि धवलाने देखील वरांगचरित्रात पद्मपुराणकर्ते रविषेणचार्याचे स्मरण केले आहे.

इतिहासकार नाथूराम प्रेमी यांच्या मते विमलसूरींचा पउमचरिउ हा ग्रंथ रविषेणांच्या पद्मपुराणा अगोदर असून रविषेणाचार्यांनी पउमचरिउ या प्राकृत रामायणाचा संस्कृत अनुवाद केला आहे. त्याची कारणे म्हणजे दोन्ही ग्रंथातील कथानक सारखे असून, नाव देखील एकच आहे. पर्व अथवा उद्देश्य अंतापर्यंतची पात्रांची व ठिकाणांची नावे सारखीच आहेत. प्रत्येक पर्वात दोघांनाही छंद बदलले आहेत. त्याशिवाय पउमचरिउमधील प्रत्येक पद्याच्या शेवटी विमल व पद्मपुराणाच्या प्रत्येक पद्याच्या शेवटी रवि शब्द आले आहेत. पद्मपुराणात काही काही ठिकाणी प्राकृत गाथांचा शब्दशः संस्कृत अनुवाद दिसतो. उदा :- पउचरिउमधील दुसऱ्या उद्देशातील १०७ ते ११८ गाथा पद्मपुराणात २३० ते २४८ मध्ये अनुवादित केल्या असल्याचे दिसते१.

पं.नाथूराम प्रेमी यांचे वरील म्हणणे बरोबर असल्याचे जरी गृहीत धरले, तरीसुध्दा कथानकात रोचकता आणण्याची पराकाष्टा आ.रविषेणांनी केलेली दिसून येते. त्यांनी पद्मपुराणात सांगितलेली ही रामकथा म्हणजे हिमकंदरापासून वहात येणारी एखादी मंदाकिनीच होय. आ.रविषेणांनी प्रसंग येताच अथवा अवधी मिळताच विद्याधर लोक अंजना पवनंजय हनुमान, सुकोशलइ. पात्रांचे जे रेखाटन

केले आहे.  त्यामुळे ग्रंथसौदर्यात अधिकच भर पडली आहे.  एवढेच नव्हे तर मनोरंजन करणारा हा ग्रंथ एकदा वाचावयास घेतला तर वाचकाला तो लवकर बाजूला करावयास वाटत नाही.

आ.रविषेणांनी लिहिलेल्या पद्मपुराणाची भाषा प्रसाद गुणांनी आतेप्रोत भरली असून, अत्यंत मनोहरण करणारी आहे. वन, नदी, सेना, युध्द इत्यादीचे वर्णन करताना तर कवि आपले देहभान विसरून बसला आहे.  चित्रकुट, पर्वत, गंगा नदी व वसंतऋतूचे वर्णन ज्या कौशल्याने आ. रविषेणांनी केले आहे तसे कौशल्य अथवा ती प्रतिभा इतर महाकाव्यातून देखील आपणास पाहावयास मिळत नाही.  अर्थात आ.रविषेणांनी संस्कृत प्राकृत या दोन्ही भाषेवर प्रभुत्व प्राप्त केल्याचे दिसते.  या महान अचार्याने पद्मपुराण